# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### वावी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे एम.एस.एम.ई. पार्क उभारुन रोजगार निर्मिती करण्याबाबत

**(१) ४४८२ (१५-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वावी (ता.सिन्नर,जि.नाशिक) परिसरात औद्योगिक वसाहत उपलब्ध नसल्यामुळे एम.एस.एम.ई. पार्क उभारण्यात आल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणे शक्य असून वावी परिसरात लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांसाठी सुमारे १०० एकर जागेत 'एम.एस.एम.ई पार्क' उभारण्याचा प्रस्ताव एमआयडीसीकडून शासनाकडे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास सादर करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिन्नर-शिर्डी महामार्गामुळे वावी परिसरातील दळणवळण सुविधा सुधारली असून भविष्यात हे पार्क जिल्ह्यातील उद्योजकांसाठी केंद्रबिंदू ठरणार असल्याने या प्रस्तावासंदर्भातील सर्व बाबींची शासनाने छाननी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०७-१०-२०२५) :** (१) व (२) मौजे वावी, ता.सिन्नर, जि.नाशिक येथील १४३.६७ हे. आर खाजगी क्षेत्राचे भूसंपादन करणेच्या अनुषंगाने सदर क्षेत्राची म.औ.वि. महामंडळाच्या भूनिवड समितीमार्फत दिनांक २३/०१/२०२५ रोजी स्थळपाहणी केली असून, म.औ.वि. अधिनियम १९६१ अन्वये सदर क्षेत्रास प्रकरण ६ च्या तरतुदी लागु करणेबाबतचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीसमोर सादर करणेकरीता प्रस्तावित करण्यात आला होता.त्यावर सदर क्षेत्रासाठी पाणीपुरवठा उपलब्धता व उद्योगांची मागणी याबाबत प्रथम खातरजमा करणेबाबत उच्चाधिकार समितीचे निर्देश प्राप्त झाले आहेत.

वरील निर्देशानुसार खातरजमा करणेची कार्यवाही क्षेत्राची म.औ.वि. महामंडळाच्या प्रादेशिक स्तरावर सुरु आहे. सदरचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर म.औ.वि. महामंडळाच्या प्रचलीत कार्यपध्दतीनुसार म.औ.वि. अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार भुसंपादनाची पुढिल कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी विनाअनुदानित शाळांना आपले उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद संकेतस्थळावर उपलब्ध करण्यास बाध्य असल्याच्या निर्णयाबाबत

**(२) १०२१९ (०२-१०-२०२१) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी विनाअनुदानित शाळांना आपले उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद संकेतस्थळावर उपलब्ध करण्यास बाध्य करणारा शासन आदेश निर्गमित करण्यासंबंधीच्या शासनाच्या भूमिकेबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी शासनास दिनांक ०१ जून, २०२१ रोजी निवेदन पाठविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी विनाअनुदानित शाळांच्या कामकाजात व आर्थिक व्यवहारात पारदर्शकता आणण्यास सदरहू शाळांना उत्पन्न व खर्चाचा ताळेबंद संकेत स्थळावर उपलब्ध करण्यास बाध्य करणारा शासन आदेश निर्गमित करण्यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे, तसेच, याबाबत केव्हापर्यंत निर्णय घेण्यात येणार आहे ?

**श्री.दादाजी भुसे (१७-११-२०२५) :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या संरक्षण भिंतींमुळे समस्या निर्माण होत असल्याबाबत

**(३) १०५३३ (१९-११-२०२१) श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश कृषी उत्पन्न बाजार समित्या या शहराच्या मध्यवर्ती किंवा शहरी भागात असून काही कृषी उत्पन्न बाजार समिती परिसराच्या भोवती भिंतीचे आवार उभारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लगतच्या परिसरातील नागरिकाना संचारासाठी दुरचा मार्ग अवलंबावा लागून अनेक अडचणींचा सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समित्यांभोवती उभारलेल्या भिंतीच्या आवारामुळे नागरिकाना ये-जा करण्यासाठी होत असलेली अडचण दुर करुन कृषी उत्पन्न बाजार समिती मधून येण्याजाण्यासाठी लगतचा परिसर मार्ग खुला करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२८-११-२०२५) :** (१) हे अंशत खरे आहे.

बाजार समित्या या तालुका स्तरावर व त्यांचे उपबाजार मोठ्या गावाच्या ठिकाणी कार्यरत आहेत. बाजार समित्या यापुर्वी गाव/शहराच्या बाहेर होत्या. मात्र गावाचा/ शहराच्या विस्तारामुळे काही बाजार समित्या गावात/शहरात आलेल्या आहेत.

राज्यातील काही कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आवारात मंजूर ले आऊट प्रमाणे बाजार समितीच्या सुरक्षा व हितासाठी अनेक समित्यांनी त्यांचे आवाराभोवती संरक्षक भिंती, तार कंपाऊड बांधलेले आहेत.

(२) व (३) बाजार समितीच्या आवारात उभारलेल्या भिंतीमुळे किंवा तारेचे कुंपण घातल्यामुळे लगतच्या परिसरातील नागरिकांना रहदारीसाठी वा ये-जा करण्यासाठी अडचण होत असल्याबाबत जिल्हा उपनिबधंक, सहकारी संस्था, सातारा यांचेकडे निवेदन प्राप्त झालेले होते. कृषी उत्पन्न बाजार समिती, कराड येथे बाजार समितीने त्यांचे आवारात संरक्षक भिंत उभारलेली आहे. सदर संरक्षक भिंतीलगतच्या परिसरातील नागरीकांना संचारासाठी तीन मार्ग उपलब्ध असून कराड नगरपरिषद कराड यांनी त्यांचे प्लॅन मध्ये ४० फुट रूंदीचा मंजूर रस्ता दर्शविलेला आहे. तो रहदारीसाठी वापरात आहे. सदर संरक्षक भिंतीबाबत मा.दिवाणी न्यायालयात दावा क्र.३७९/१९८६ मध्ये झालेल्या चौकशीच्या आधारे मा.दिवाणी न्यायालयाने निर्णय देवून बाजार समिती आवारास असलेली संरक्षक भिंत सुरक्षितेच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. या संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.२९०८४/२०१८ दाखल असून, मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश पारित केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पात्र उमेदवारांस कायमस्वरुपी टीईटी पात्र समजण्याबाबत

**(४) १४२२७ (२५-०८-२०२२) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवेत कार्यरत असलेल्या व शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता दिलेल्या परंतु, माहे मार्च, २०२२ अखेर टीईटी उत्तीर्ण न झालेल्या राज्यातील शिक्षकांची संख्या किती आहे व सदरहू शिक्षकांचे वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एकदा टीईटी परीक्षा पात्र झालेल्या उमेदवारास कायमस्वरुपी टीईटी पात्र समजण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०९-२०२५) :** (१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार कार्यरत शिक्षकांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता दिनांक ३१/०३/२०१९ पर्यंत संपादित करणे बंधनकारक आहे. त्यानुसार दिनांक २४/०८/२०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षकांनी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेली किमान अर्हता दिनांक ३०/०३/२०१९ अखेर धारण करणे अनिवार्य केले आहे. त्यानुसार कार्यरत शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा दिनांक ३०/०३/२०१९ पर्यंत प्राप्त करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिक्षकांच्या सेवा संपुष्टात करण्यात याव्यात, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मार्च, २०१९ नंतर शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांच्या बाबतीत वेगळयाने कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) एकदा शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कायमस्वरुपी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण समजण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परिक्षेत आर्थिकदृष्टया मागास घटकातील (ईडब्लुएस) विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत

**(५) १५६६० (०५-१२-२०२२) श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात परीक्षा परिषदेच्यावतीने घेण्यात आलेल्या ५ वी ते ८ वी च्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परिक्षेत आर्थिकदृष्टया मागास घटकातील (ईडब्लुएस) विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया मागास घटकातून संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदर विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२४-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपुरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हीरक महोत्सव वर्षानिमित्त क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(६) १७२८१ (२५-०३-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपुरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या हीरक महोत्सव वर्षानिमित्त क्रीडा संकुल उभारण्याकरीता ११ कोटीचा प्रस्ताव शासनाने सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावांतर्गत उत्कृष्ट प्रकारच्या खेळपट्ट्या, प्रेक्षक गॅलरी, टेनिस कोर्ट, बॅडमिंटन कोर्ट आणि जलतरण तलाव याचे नूतनीकरण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपुर येथील शासकीस वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी रहात असलेल्या वसतिगृहाची अत्यंत दुर्दशा झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, क्रीडा संकुल उभारण्याकरीता सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये वसतिगृहाच्या नूतनीकरणाचा प्रस्तावाचा समावेश करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने क्रिडा संकुल उभारण्याच्या प्रस्तावात महाविद्यालयाच्या वसतिगृहाचे नुतनीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव समावेश करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) हे खरे नाही.
तथापि, वसतिगृह इमारतीच्या श्रेणीवर्धनाबाबत स्वतंत्रपणे दिनांक ०१/०२/२०२४ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रगतीपथावर आहे.
(६) लागू नाही.

---

## मुंबई विभागातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(७) १८७८८ (१६-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगर तसेच रायगड, ठाणे, पालघर या जिल्ह्यांतील तब्बल ७ हजारांहून अधिक अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विभागातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयांवर सदरची शिष्यवृत्ती तातडीने देण्याबाबत कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (१४-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) २०२२-२३ या वर्षासाठी त्रुटीपुर्ततेत असलेले अर्ज पुनश्च सादर करण्याची कार्यवाही सुरु असून महाविद्यालयस्तरावरील प्रलंबित अर्जाबाबतची पुर्तता करुन सादर करण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच कोणताही विद्यार्थी हा मॅर्टिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची खातरजमा करण्यात आलेली आहे. दिनांक ०६/०९/२०२३ रोजीच्या शासन

परिपत्रकानुसार अनेक महाविद्यालयांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन बऱ्याच विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे शिष्यवृत्तीची रक्कम अप्राप्त असूनही विद्यार्थ्यांना देण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रश्न उद्‍भवत नाही.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही

---

## राज्यातील अनुदानित शाळांमध्ये पूर्णवेळ नोकरीवर असलेल्या शिक्षकांना रात्रशाळेत दुबार शिक्षक म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(८) १९४०२ (०४-०८-२०२३) श्री.सचिन अहिर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित शाळांमध्ये पूर्णवेळ नोकरीवर असलेल्या शिक्षकांना रात्रशाळेत दुबार शिक्षक म्हणून नियुक्ती केल्याप्रकरणी अर्धवेळ शिक्षकांच्या नोकऱ्या संकटात आल्या असून नोकऱ्या गमावण्याची वेळ आल्यामुळे अर्धवेळ शिक्षकांनी दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास आझाद मैदान, मुंबई येथे आंदोलन करुन दुबार नोकऱ्या देण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २७६ रात्रशाळांत व कनिष्ठ महाविद्यालयातील अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीत बदल करणारा शासनाने १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने पूर्णवेळ नोकरीवर असलेल्या शिक्षकांना रात्रशाळेत दुबार शिक्षक म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०९-२०२५) :** (१) रात्रशाळेमध्ये दूबार शिक्षकांच्या नियुक्ती रद्द करणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने निवेदने व लोकप्रतिनिधींची मागणी शासनस्तरावर प्राप्त होत आहे.
(२) होय हे खरे आहे. तथापि, सदरचा शासन निर्णय दिनांक ३०/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात आलेला आहे.
(३) दूबार शिक्षक नियुक्तीबाबतचा दिनांक ३०/०६/२०२२ चा शासन निर्णय रद्द करणेसंदर्भात होत असलेल्या परस्परविरुध्द मागण्यांच्या अनुषंगाने सुधारित रात्रशाळा धोरण विहीत करण्याकरीता आयुक्त (शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, उक्त समितीचा अंतिम अहवाल प्राप्त होताच याबाबत सुधारित रात्रशाळा धोरण विहीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्यात बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील भोई समाजाने आपल्या विविध समस्याबाबत तहसिल कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढल्याबाबत

**(९) २०७८२ (०८-०८-२०२३) ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील (ता.संग्रामपूर) भोई समाजाने त्यांच्या विविध समस्या व प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी संग्रामपूर येथे तहसिल कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढला असल्याची बाब माहे, मे २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, खरे हे आहे काय,

(२) असल्यास, या समाजातील बेघर नागरिकांना जागा उपलब्ध करून घरकुलचा लाभ मिळावा, मत्स्य विकास विभागाचा १२ मे, २०२३ चा निर्णय रद्द करून ३ मे, २०१९ चा निर्णय कायम ठेवून समाजाची स्वतंत्र जनगणना करून अनुसूचित जातीचे आरक्षण मिळावे अश्या विविध मागण्यांसाठी भोई समाजाने आक्रोश मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मोर्चात केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२८-०७-२०२५) :** (१) व (२) होय.

(३) व (४) या विभागाशी संबंधित असलेल्या मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच इतर विभागाशी संबंधित मागण्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे.

---

## राज्यातील नवीन स्वयंअर्थसहाय्य शाळांना देण्यात येणाऱ्या परवानगीबाबत

**(१०) २१८८३ (०५-०१-२०२४) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वयं अर्थसहाय्य तत्वावर सद्य:स्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात नवीन शिक्षण संस्थांना परवानगी देत असताना सदर परवानगी मास्टर प्लॅननुसार देण्यात येत नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरटीईच्या नियमानुसार १ कि.मी. परिसरात प्राथमिक शाळा, ३ कि.मी. परिसरात माध्यमिक शाळा, ५ कि.मी. परिसरात उच्च माध्यमिक शाळा कॉलेज असणे बंधनकारक असून या नियमांचे पालन केले जात नाही, हे ही ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने नवीन स्वयं अर्थसहाय्य शाळांना परवानगी देत असताना मास्टर प्लॅन नुसार परवानगी न देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१०-१०-२०२५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १४/०६/२०१२ अन्वये ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या नवीन प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांना परवानगी देण्याकरीता बृहत आराखडा निश्चित करण्यात आलेला होता. तथापि, तदनंतर मा.मंत्रिमंडळाने दिनांक १५/११/२०१६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, शासन निर्णय दिनांक ०२ मार्च, २०१७ अन्वये, मराठी माध्यमिक शाळांबाबत तयार करण्यात आलेला बृहत आराखडा धोरण, गरजेनुसार परवानगी द्यावयाच्या उर्दू माध्यमाच्या माध्यमिक शाळांबाबतचे धोरण तसेच सीमावर्ती भागातील मराठी माध्यमिक शाळांबाबतचे धोरण इत्यादींच्या अनुषंगाने मागविण्यात आलेले सर्व प्रस्ताव, या संदर्भातील सर्व आदेश व शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.

राज्यात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२, दिनांक १९ जानेवारी २०१३ पासून लागू झाला असून सद्य:स्थितीत त्यानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सर्व माध्यमाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक नवीन शाळा खाजगी संस्थामार्फत सुरू करण्याची तसेच विद्यमान शाळांची दर्जावाढ करण्याची तरतूद करण्यात आली आहे. स्वयंअर्थसहाय्यित शाळांबाबत बृहत आराखडा धोरण अस्तित्वात नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विभागीय अभियंता, बेस्ट कार्यालय, वडाळा आगार (मुंबई) यांच्या गैरवर्तणुकीबाबत

**(११) २१९५१ (०५-०१-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय अभियंता (ग्राहक सेवा), ग/दक्षिण विभाग, बेस्ट कार्यालय, वडाळा आगार (मुंबई) यांच्याकडून सातत्याने लोकप्रतिनिधींची अवहेलना करण्यात येत असल्याबाबतची लेखी तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महाव्यवस्थापक, बेस्ट यांचेकडे माहे सप्टेंबर, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधीची अवहेलना करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

सदर विषयाबाबत बेस्ट उपक्रमाकडे श्री.सुनिल शिंदे, मा.वि.प.स. यांचा दिनांक १७/०७/२०२३ चा तक्रार अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाला.

(२) सदर तक्रारीची बेस्ट उपक्रमाद्वारे शहानिशा केली असता असे निदर्शनास आले की, विभागीय अभियंता (ग्राहक सेवा), ग/दक्षिण विभाग यांनी लोकप्रतिनिधीची अवहेलना होईल असे कुठेलेही विधान केलेले नाही. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती बेस्ट उपक्रमाद्वारे श्री.सुनिल शिंदे, मा.वि.प.स. यांना दिनांक ०९/०८/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) कोकण परिमंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) २२१०७ (०५-०१-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) नियमानुसार दरमहा ६०० आस्थापनांची तपासणी करणे अपेक्षित असताना कोकणात यावर्षी माहे एप्रिल ते जून, २०२३ या कालावधीत केवळ ६२३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न औषध प्रशासन कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने तसेच कोकण परिमंडळात ११० रिक्त पदे असल्याने सातत्याने आस्थापनांची तपासणी होत नसल्याने तेथील दुकानदारांवर वचक राहिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदर ११० पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (१०-०९-२०२५) :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या औषध विभागाने कोकण विभागात माहे एप्रिल ते जून २०२३ या कालावधीत एकूण ४६१ औषध विक्री आस्थपनाच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत.

(२) कोकण विभागात माहे, जून २०२३ अखेर सह आयुक्त (औषधे), सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक तसेच, सह आयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी यांची १४२ पदे मंजूर होती, त्यापैकी ६७ पदे भरलेली व ७५ पदे रिक्त होती.

(३) अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक, गट-ब या संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याकरीता शासन पत्र दिनांक १२/०२/२०२५ अन्वये एकूण १०९ पदांच्या पदभरती करण्याबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले असून, त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षकांच्या एकूण १०९ पदांच्या पदभरतीबाबत दिनांक २९/०७/२०२५ रोजी जाहिरात क्र.११६/२०२५ प्रसिध्द केली आहे. याबाबत, पुढील कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात बहुतांश प्राथमिक शाळांमधून जुने अभिलेख जीर्ण झालेले असल्याबाबत

**(१३) २२१०८ (०५-०१-२०२४) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात बहुतांश जि.प. प्राथमिक शाळांमधून जुने अभिलेख पुसट व जीर्ण झालेले असल्याचे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईट आदी दाखले मिळविण्यासाठी आदिवासी बांधवांना प्रचंड त्रास होत असून जातीचा दाखला काढणे बस प्रवास सवलत आदी सवलतींपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने जुने अभिलेख जतन व संवर्धन करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू जुन्या नोंदींच्या ई संवर्धनाकरीता शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (१७-१०-२०२५) :** (१) व (२) मोखाडा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १५४ शाळा आहेत. सदर शाळांपैकी काही शाळेमधील जुने अभिलेख जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांना शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड देतांना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रतिज्ञापत्र करुन जातीचे दाखले मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. परंतु विद्यार्थ्यांना कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवले जात नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील पानशेत व वरसगाव धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीचे निर्वणीकरण करण्याबाबत

**(१४) २२२६० (०४-०१-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय : तारांकित प्रश्न क्रमांक १९९९१ ला दिनांक २८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पानशेत व वरसगाव धरण तयार करताना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या अधिग्रहित केलेल्या भोगवटादार वर्ग-१ च्या जमिनीच्या मोबदल्यात दौंड तालुक्यातील वाटप केलेल्या भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीचे निर्वणीकरण आजमितीस झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग यांच्या शासन निर्णय क्र. आरपीए-२०१९/प्र.क्र २०/र-१ दिनांकित ०७/०३/२०१९ मध्ये प्रकल्पग्रस्तांना भोगवटादार वर्ग-२ वर देण्यात आलेल्या शेतजमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत कार्यपध्दती विहीत केलेली असतानासुध्दा सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याबाबतच्या शेतकऱ्यांनी केलेल्या अर्जांवर उपवनसरंक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालयाने सदरची नवीन शर्त तसेच वनासंबंधी कोणतीही नोंद कमी करता येणार नाही व जमीन धारणा प्रकार बदलता येणार नाही असे अभिप्राय दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय आढळून आले, उपरोक्त प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनीचे निर्वणीकरुन त्यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच माहे ऑक्टोबर, २०२३ पर्यंत दौंड तालुक्यातील किती प्रकल्पग्रस्तांच्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मधे रूपांतर केले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) (१२-११-२०२५) :** (१) व (२) पुणे जिल्ह्यातील पानशेत व वरसगांव प्रकल्पातील धरणग्रस्तांना दौंड तालुक्यामध्ये पर्यायी जमिनी वाटप करुन पुनर्वसन करण्यात आलेले आहे. सदर वाटप केलेल्या जमिनींपैकी काही जमिनी ह्या वन संवर्गातील असून राखीव वन म्हणून घोषीत आहे. सदर जमिनींचे निर्वणीकरण न झालेमुळे त्यांना वन विभागाच्या तरतुदी लागु आहे. सदर जमिनींवर राखीव वनांची नोंद कमी करण्यासाठी केंद्र शासनाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.
(३) पाटबंधारे प्रकल्पातंर्गत दौंड तालुक्यामध्ये प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या जमिनींमध्ये राखीव वन शेरा असलेल्या जमिनींची माहीती प्राप्त करुन घेवून निर्वणीकरण करणेबाबतचा प्रस्ताव वन विभागाकडे सादर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पडघा (जि.ठाणे) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या वीज चोरीबाबत

**(१५) २२८८७ (१४-०६-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरूंद रोड, अर्जुनली, पोस्ट-पडघा (जि.ठाणे) येथील भूमापन क्र. २१, पो.हि. क्र.२ येथे विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पातील ५ सदनिकाधारकांकडे अनधिकृतपणे विद्युत चोरी होत असल्याची तक्रार टोरंट वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पडघा पोलीस ठाण्यात माहे जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास नोंदविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत विद्युत चोरी करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०२५) :** (१) व (२) पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांच्या दिनांक २९/०८/२०२५ रोजीच्या अहवालात नमूद केल्यानुसार कुरूंद रोड, अर्जुनली, पोस्ट- पडघा (जि.ठाणे) येथील भूमापन क्र. २१, पो.हि. क्र. २ येथे विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पातील ५ सदनिकाधारकांकडे अनधिकृतपणे विद्युत चोरी होत असल्याची तक्रार टोरंट वीज कंपनीने ठाणे ग्रामीण पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या पडघा पोलीस ठाणे येथे नोंदविलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील घरेलु कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१६) २२९८० (२०-०७-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक २१२७८ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे ४५ लाख घरेलु कामगार कार्यरत असून सदर कामगारांना श्रमिक म्हणून दर्जा मिळावा, सामाजिक सुरक्षा व इतर अधिकार मिळण्याकरीता या कामगारांनी वेळोवेळी आंदोलने केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरेलु कामगारांच्या मागण्या मान्य होत नसल्यामुळे या कामगारांनी राज्यव्यापी संपाचा इशारा दिला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी घरेलु कामगारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण होण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०७-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात माहे जुलै, २०२५ पर्यंत एकूण ६,४६,८३८ इतक्या घरेलू कामगारांनी नोंदणी केलेली आहे. तसेच घरेलू कामगारांना सामाजिक सुरक्षा व इतर योजनांचा लाभ मिळावा यासाठी निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(२) याबाबत शासनास घरेलु कामगारांच्या राज्यव्यापी संपाबाबतचे कोणतेही निवेदन आढळून येत नाही
(३) घरेलू कामगार मंडळामार्फत सद्य:स्थितीत पात्र जीवित/सक्रिय नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी पुढीलप्रमाणे योजना कार्यान्वित आहेत :-

(अ) घरेलू कामगार महिला लाभार्थीकरीता प्रसुती लाभ
(ब) घरेलू कामगार लाभार्थीचा मृत्यू झाल्यास कायदेशीर वारसाला अंत्यविधी सहाय्य
(क) सन्मानधन योजना
(ड) घरेलू कामगार लाभार्थीला भांडी वाटप संच.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात कृषीपुरक व तेलप्रक्रीया उद्योग उभारण्याबाबत

**(१७) २३५३० (२०-०७-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्याची कॉटन सिटी म्हणून ओळख असून जिल्ह्यात सोयाबीनचे क्षेत्रही मोठ्या प्रमाणात असताना खाजगी वा सार्वजनिक शेतीपूरक कापूस आणि तेल प्रक्रिया उद्योग उभारण्यात न आल्याने तसेच जिल्ह्यात सिंचन प्रकल्पही प्रलंबित असल्याने बेरोजगारी वाढत असून तरुणांचे रोजगारांसाठी शहरांकडे स्थलांतर होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी धोरणात्मक उपाययोजना करण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही,

अकोला जिल्ह्यात संघटीत क्षेत्रात कापूस प्रकिया मध्ये जिनिंग व प्रेसिंगचे ८७ उद्योग घटक कार्यरत असून ९७५ रोजगार निर्मिती झाली आहे. तसेच ऑईल मिलचे १९ उद्योग घटक कार्यरत असून २४४ रोजगार निर्मिती झाली आहे.

(२) राज्यामध्ये उद्योगांचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे या कारणास्तव राज्यामध्ये सन १९६४ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. प्रचलित सा.प्रो.यो.२०१९ ही दिनांक १६/०९/२०१९ च्या शासन निर्णयाने जाहीर करण्यात आली आहे. सदर योजनेच्या करण्यात आलेल्या तालुका वर्गीकरणानुसार ड, ड+, नक्षलग्रस्त जिल्हे, विना उद्योग जिल्हे व आकांक्षित जिल्हे वर्गवारी असलेल्या तालुक्यातील उद्योगांना अ, ब, क वर्गीकरण असलेल्या तालुक्यापेक्षा जास्तीच्या सवलती देण्यात येत असल्यामुळे औद्योगिकदृष्ट्या अविकसित व ग्रामिण भागात उद्योग स्थापित होण्यास चालना मिळाली आहे.

साप्रोयो-२०१९ अंतर्गत अकोला जिल्हा हा विदर्भ/ मराठवाडा या वर्गीकृत क्षेत्रात समाविष्ट आहे. त्यामुळे अ, ब, क या प्रगत वर्गीकृत क्षेत्रापेक्षा या जिल्ह्यात स्थापित होणाऱ्या उद्योगांना जास्तीच्या सवलती अनुज्ञेय आहे. त्यामध्ये १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी, ७ ते १५ वर्षापर्यंत विद्युत शुल्क माफी सवलत व १०० टक्के राज्य वस्तु व सेवा कराचा परतावा अनुज्ञेय आहे. त्याचबरोबर सामुहिक सुविधा केंद्र उभारण्याकरीता औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत प्रकल्प किंमतीच्या ८०% व ९० % पर्यंत अनुदान महाराष्ट्र शासना कडून देण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मीरा-भाईदर महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त यांची सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्याच्या निर्णयाबाबत

**(१८) २३६१३ (१४-०८-२०२४) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईदर महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त यांची सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालिन आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका यांना कमाल नागरी जमीन धारण (युएलसी) गैरव्यवहारप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाकडून समन्स बजाविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच तत्कालिन आयुक्त यांची थेट सिडकोच्या सह व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्त करण्यामागील कारणे काय आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-१०-२०२५) :** (१) श्री.दिलीप पोपट ढोले यांची सिडको महामंडळामध्ये दिनांक १५/०१/२०२४ रोजी सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती.
(२) यासंदर्भात जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे यांचे कार्यालयास समन्स बाबत अवगत नाही, असे अभिप्राय प्राप्त आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पोलीस पाटील यांना मानधन व प्रवासभत्ता मिळणेबाबत

**(१९) २३८५२ (२२-०७-२०२४) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २८००० पोलीस पाटील कार्यरत असून त्यांना दरमहा ६५०० रुपये मानधन दिले जाते परंतु मागील २ महिन्यापासून मानधन मिळालेले नसल्याचे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस पाटीलांना दरमहा मिळणारा ५०० रुपये प्रवास भत्तादेखील गत तीन वर्षापासून मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस पाटील यांचे मानधन व प्रवास भत्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही .

पोलीस पाटील यांचे मानधन माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत मंजूर करण्यात आलेले आहे. तसेच सदरची मानधनाची रक्कम घटकनिहाय बी.डी.एस. प्रणालीवर पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत उपलब्ध करुन दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

पोलीस पाटील यांना दरमहा मिळणारा प्रवासभत्ता रुपये ५००/- अदा करण्यात येते. शासन निर्णय क्र.०६११/प्र.क्र.४१८/पोल-८, दिनांक १५/१०/२०११ अन्वये पोलीस पाटलांचे संबंधित गाव ते संबंधित पोलीस स्टेशन यातील अंतर व त्यानुसार आकारावयाचा प्रवासभत्याचा दराप्रमाणे राज्यातील पोलीस पाटलांना प्रवासभत्ता देण्यात येतो.

(३) राज्यातील पोलीस पाटील यांना मानधन व प्रवासभत्ता वेळेवर अदा करण्याबाबत वेळोवेळी सर्व पोलीस घटक कार्यालयाना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला महानगरपालिका अंतर्गत बनावट खाजगी कंपनीला जकात कर वसुलीचे कंत्राट दिल्याबाबत

**(२०) २४१५३ (१६-०७-२०२४) श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेमध्ये स्वतंत्र कर विभाग असतानाही महानगरपालिका प्रशासनाने मालमत्ता कर वसुली करीता खाजगीकरण करून ठेका पध्दतीने कर वसुली करण्याची निविदा प्रक्रिया राबविली असून यात झारखंड, रांची, येथील २ कंपनीच्या निविदा प्रशासनाकडे प्राप्त झाल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या निविदा प्रक्रियेच्या प्रचलित नियमांचा वापर न करता कोणतेही प्रतिनिधी मंडळ अस्तित्वात नसताना स्वाती इंडस्ट्रीज नावाच्या चुकीची माहिती सादर करणाऱ्या व प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या कंपनीला महानगरपालिकेतील पदाधिकारी व स्थानिक पदाधिकारी यांनी संगनमत करून अवैधरित्या कंत्राट देऊन गैरव्यवहार झाल्याची बाब विविध सामाजिक संघटनांनी निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका विविध कर वसुलीचे खाजगीकरण करून नियमित कर भरणाऱ्या नागरिकांवर अन्याय करून करोडो रुपयांचा महसूल मिळवत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध पध्दतीने कंत्राट दिलेल्या अधिकाऱ्यांवर व संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) अकोला महानगरपालिका प्रशासनाद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक २७/०९/२०१८ व शासन निर्णय दिनांक २९/०१/२०१९ मधील प्रचिलित नियमांचा वापर करुन मालमत्ता कर वसुली करीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. निविदाधारकांनी निविदेमध्ये सादर केलेल्या दस्ताऐवजांची समितीने पडताळणी करुन निविदेस दिलेल्या गुणाकांच्या आधारे स्वाती इंडस्ट्रीज कंपनीला कार्यादेश देण्यात आले आहेत. विलंबाबाबत प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**नागपूर.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.